**तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व सहायक सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ**

**सत्र खटला क्र. ४३/२०२५**
**निशाणी क्र. २२**

**महाराष्ट्र शासन** तर्फे पो.स्टे.वडगाव जंगल सरकारी अभियोक्ता
**..वि..**
**संजय तुकाराम खेकडे** आरोपी.

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. २** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की - | |
| माझे संपूर्ण नाव | संतोष रमेश घोडमारे |
| वय अंदाजे ३५ वर्षे | धंदा- नौकरी, यंत्र चालक, एम.एस.ई.डी. सी. एल., परतवाडा. |
| राहणार | अंजनगाव बारी, जि.अमरावती. |
| **सरतपासणी श्रीमती एस. व्ही. दरणे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः-** | |

सन २०१९ ते सन २०२३ पर्यंत मी यंत्र चालक या पदावर जोडमोहा सब स्टेशन येथे कार्यरत होतो. मनिष वासूदेव राठोड यांना मी ओळखतो व ते सहाय्यक अभियंता म्हणून जोडमोहा येथे कार्यरत होते. दिनांक १८/११/२०२२ रोजी मी सब स्टेशन जोडमोहा येथे कार्यरत होतो. त्यादिवशी दुपारी १.३० वाजता दोन व्यक्ती सहाय्यक अभियंता यांच्या कार्यालयामध्ये गेल्या होत्या व थोडयावेळाने मला कार्यालयातून जोर–जोरात आवाज आला. त्यामुळे मी तेथे गेलो असता मला दिसले की संजय तुकाराम खेकडे यांनी सहाय्यक अभियंता श्री मनिष राठोड यांची कॉलर पकडलेली होती व टेबलवरील साहीत्य व कागदपत्र अस्ताव्यस्त पडलेले होते. त्यानंतर संजय खेकडे यांनी कॉलर सोडली व तुला पाहून घेतो अशी धमकी मनिष राठोड यांना दिली व आरोपी संजय खेकडे तेथून निघून गेला. त्यानंतर मी सहाय्यक अभियंता श्री मनिष राठोड यांना विचारपूस केली असता संजय त्यांनी मला सांगीतले की ट्रॉन्सफॉर्मर गेल्यामुळे संजय खेकडे हे विचारपूस करण्याकरीता आले होते. आरोपी संजय खेकडेनी त्यावेळी जोर–जोरात हुज्जत घातली. मनिष राठोड यांनी आरोपीला सांगीतले की तुमचा प्रश्न वरिष्ठ कार्यालयात विचारा. त्यानंतर

आरोपीने टेबलावरील साहित्य फेकले व मनिष राठोडची कॉलर पकडून त्यांना शिवीगाळ केली, असे मनिष राठोडने मला सांगीतले. आरोपी संजय खेकडे हा आज न्यायालयात हजर आहे व मी त्याला ओळखतो. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. हजेरी पट आर्टीकल ब मध्ये मी कार्यालयात हजर असल्याबाबत माझे नाव आहे.

**<u>उलट तपासणी आरोपीचे वकील श्री. आर. एस. चव्हाण यांचे मार्फत सुरु –</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की मी यंत्र चालक असल्यामुळे माझा ग्राहकांसोबत जास्त संपर्क येत नाही. माझे मुळ गाव अंजनगाव बारी, जि.अमरावती आहे. जोडमोहा या गावातील सर्व लोकांना मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादी मनिष राठोड यांची कार्यालयामधील खोली व माझी खोली वेगवेगळी आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की यंत्र चालकाची ड्युटी ही शिफ्टप्रमाणे असते. सब स्टेशनमध्ये एका शिफ्टमध्ये एक यंत्र चालक हजर असतो. त्यादिवशी मी सकाळी कर्तव्यावर हजर असल्याबाबतचा शिफ्ट ड्युटी चार्ट पोलीसांना मी दिला नाही.

४. पोलीसांना बयान देतेवेळी मी सांगीतले होते की त्यादिवशी दुपारी १.३० वाजता दोन व्यक्ती सहाय्यक अभियंता यांच्या कार्यालयामध्ये गेल्या होत्या. मात्र ही बाब माझ्या बयानात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की ज्या दोन व्यक्ती सहाय्यक अभियंता यांच्या कार्यालयामध्ये आल्या होत्या, त्या दोन्ही व्यक्तीना मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की आज मी ' संजय खेकडे ' हे नाव पुराव्यादरम्यान सांगीतले, ते नाव मला माझ्या कार्यालयातून समजले. हे म्हणणे खरे आहे की ' संजय खेकडे ' यांना मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनेच्यावेळी मला ' संजय खेकडे ' चे नाव माहित नव्हते.

५. हे म्हणणे खरे आहे की मी ज्यावेळी कथित घटनास्थळावर गेलो, त्यावेळेस मला टेबलावरील साहित्य हे अगोदरच फेकलेले होते व ते साहित्य माझ्यासमोर कोणीही

फेकले नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनेनंतर मी आरोपीला आज न्यायालयात प्रथमच पाहत आहे. साक्षीदार स्वतः सांगतात की दिनांक १८/११/२०२२ रोजी सुध्दा मी आरोपीला पाहिले होते.

६. हे म्हणणे खरे नाही की आमच्या कार्यालयामध्ये सि.सि.टि.व्ही. आहे. हे म्हणणे खरे नाही की राठोड साहेबांसोबत पोलीस स्टेशनला गेलो होतो.मला माहिती नाही की श्री. मनिष राठोड हे लोकांची कामे करत नसल्यामुळे, त्यांची तक्रार वरिष्ठांकडे लोकांनी केली होती. हे म्हणणे खरे नाही की त्याचा वचपा काढण्याकरीता श्री राठोड साहेबांनी आरोपीच्या विरोधात खोटी कैफियत दिली व आज मी राठोड साहेबांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या सरतपासामध्ये सांगीतल्याप्रमाणे कॉलर पकडण्याची तसेच शिवीगाळीची कुठलीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की श्री राठोड हे माझे वरिष्ठ असल्यामुळे त्यांच्या सांगण्यावरुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास– काही नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)

दिनांक – २३/१२/२०२५ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.